**KfW approves loan of EUR 545 Million for Metro Line 4 and 4 A**

Mumbai

November 6,

The German Federal Ministry for Economic Cooperation and Development (BMZ) - KfW approved two loans for a total of EUR 545 million to the Indian Ministry of Finance to fund Metro Line 4 (Wadala to Kasarvadavli) and Line 4 A (Kasarvadavli --Gaikmukh) that will ease the distress of millions of commuters each day and help provide a cleaner, less congested city.

According to the MMRDA, which is implementing Metro Line 4 & 4A, the credit package is made up of one development loan of EUR 345 million and one promotional loan of EUR 200 million. Of EUR 345 Million loan money approved, EUR 255 Million will be used on purchasing rolling stock and on integrated ticketing system and EUR 90 Million will be utilised on multimodal integration system. After negotiations, the rate of interest on EUR 345 Million is 0.29% and 0.07%. While on EUR 200 Million the rate of interest is 0.82%.

In fact, EUR 545 Million loan amount approved by Kfw is the highest amount given to India ever before that too at lowest rate of interest offered by any financial institution so far.

Hon. Chief Minister Shri Uddhav Thackeray stated , ‘‘ Though it is good to take decisions to start mega transportation projects, which are very much required in Mumbai, it is more important to do financial closures and provide all supports to Project authorities like making available the required land etc, without which projects can’t be completed. I am happy that now Lines 4 and 4A do not have any major hurdle and hope that these will be completed on time.’

Kfw providing loan to MMRDA for expansion of metro projects has eliminated skepticism that were raised regarding lack of fund to carry out various metro projects initiated and planned in the MMR.

MMRDA Commissioner R A Rajeev commented, "I welcome the approval of loan by KfW for Metro line 4 and 4A. MMRDA has built reputation over the years by successfully implementing various infrastructure projects and simultaneously meeting all financial commitments, including Pandemic times, to various lending institutions."

He further said, "MMRDA is also working for mitigation of climate change by executing Metro projects across Mumbai Metropolitan Region. Once metro line 4 and 4A have begun operations, it will help to save up to 121,000 tones of greenhouse gases every year, besides ensuring reduction in air pollution."

According to MMRDA, approved funds will covers system components for Mumbai's Metro Line 4 and 4A, as well as footpaths and cycle routes surrounding the stations to improve integration within the transport system. The 34 kilometers long Metro Line 4 will bring north-south connectivity, linking Mumbai to Thane.

The MMRDA is bringing significant development in the public transportation system by building 14 different metro line projects in Mumbai and MMR. At present, due to no substitute and with just one Metro line in the city that is operational between Ghatkopar and Versova of 11km, commuters are compelled to travel in overcrowded suburban local trains that often leads to accidents. However, once all metro lines are operational not just it will reduce the burden on local trains but will also relieve strain from commuter traffic, reduce traffic accidents and respiratory problems caused by air pollution and contribute to climate change mitigation

**मेट्रो लाइन 4 आणि 4 ए साठी केएफडब्ल्यूने मंजूर केले 545 दशलक्ष यूरोचे कर्ज**

मुंबई, दि. 6 नोव्हेंबर : जर्मनीच्या आर्थिक सहकार आणि विकास मंत्रालय (बीएमझेड) -केएफडब्ल्यूने मेट्रो लाइन 4 (वडाळा ते कासारवडवली) आणि मेट्रो लाइन 4 ए (कासारवडवली ते गायमुख) करीता वित्तपुरवठा करण्यासाठी केंद्रीय वित्त मंत्रालयाला एकूण 545 दशलक्ष युरोची दोन कर्जे मंजूर केली आहेत. मेट्रोमुळे लाखो प्रवाशांचा प्रवासातील त्रास कमी होणार असून अधिक स्वच्छ आणि सुसह्य शहर निर्मितीस मदत होणार आहे.

मेट्रो लाइन 4 आणि 4 ए चे काम करणाऱ्या एमएमआरडीएने दिलेल्या माहितीनुसार केएफडब्ल्यूच्या क्रेडीट पॅकेजमध्ये 345 दशलक्ष युरोचे विकास कर्ज आणि 200 दशलक्ष युरोचे प्रोत्साहन कर्ज आहे. यापैकी मंजुर झालेल्या 345 दशलक्ष युरोच्या कर्ज रकमेपैकी 255 दशलक्ष युरो हे रोलींग स्टॉक खरेदी आणि एकात्मिक तिकीट प्रणालीसाठी तर 90 दशलक्ष युरो हे मल्टीमोडल इंटीग्रेशन सिस्टीमसाठी वापरले जातील. वाटाघाटीनंतर 345 दशलक्ष युरोचा व्याजदर 0.29 टक्के आणि 0.07 टक्के आहे, तर 200 दशलक्ष युरोचा व्याजदर 0.82 टक्के आहे.

केएफडब्ल्यूने मंजूर केलेल्या 545 दशलक्ष युरो कर्जाची रक्कम ही यापुर्वी कोणत्याही वित्तीय संस्थेमार्फत भारताला देण्यात आलेल्या रकमेत सर्वाधिक असून ती सुद्धा कमी व्याजदराने देण्यात आलेली रक्कम आहे.

मा. मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे म्हणाले की, '' मुंबईत आवश्यक असणारे मेगा ट्रान्सपोर्ट प्रकल्प सुरू करण्याबाबत निर्णय घेण्याबरोबरच त्यासाठी आर्थिक उपलब्धता करणे तसेच प्रकल्प राबविणाऱ्या संबंधीत प्राधिकरणांना आवश्यक जमीन उपलब्ध करुन देण्यासारखे सर्व सहकार्य देणे आवश्यक आहे. ज्याशिवाय प्रकल्प पूर्ण होऊ शकत नाहीत. मला आनंद आहे की आता मेट्रो लाइन्स 4 आणि 4 ए मध्ये कोणतीही मोठी अडचण नसून ती वेळेवर पूर्ण होतील, अशी मला आशा आहे."

एमएमआर क्षेत्रातील मेट्रो प्रकल्पांच्या विस्तारासाठी केएफडब्ल्यू हे एमएमआरडीएला कर्ज पुरवठा करत आहे. यामुळे मुंबई महानगर क्षेत्रात कामे सुरू असलेल्या व नियोजित असलेल्या मेट्रो प्रकल्पांसाठी निधीचा अभाव भासणार नाही.

एमएमआरडीएचे महानगर आयुक्त श्री. आर. ए. राजीव म्हणाले की, "मेट्रो लाइन 4 आणि 4 ए साठी केएफडब्ल्यूने कर्ज मंजुर केल्याचे मी स्वागत करतो. एमएमआरडीएने अनेक पायाभूत प्रकल्प यशस्वीरित्या राबवून तसेच साथीच्या काळासह इतर वेळीही सर्व वित्तीय वचनबद्धतेची पूर्तता करून कर्ज देणाऱ्या संस्थांसमवेत संबंध वृद्धींगत केले आहेत."

ते पुढे म्हणाले, "एमएमआरडीए मुंबई महानगर प्रदेशात विविध मेट्रो प्रकल्प राबवून हवामानातील बदल कमी करण्यासाठी काम करत आहे. मेट्रो लाइन 4 आणि 4 ए सुरु झाल्यानंतर दरवर्षी सुमारे १ लाख २१ हजार टन ग्रीनहाऊस गॅसची बचत होण्यास मदत होईल, त्यामुळे वायू प्रदूषण कमी होईल."

एमएमआरडीएने दिलेल्या माहितीनुसार, मंजूर निधीमधून मुंबईच्या मेट्रो लाईन 4 आणि 4 ए साठी प्रणाली घटक निर्मिती तसेच स्थानकांच्या आसपासचे पदपथ आणि सायकल मार्गांचा समावेश असेल, जेणेकरून वाहतूक व्यवस्थेतील एकत्रीकरण सुधारेल. 34 किलोमीटर लांबीची मेट्रो लाइन 4 ही शहराच्या उत्तर - दक्षिण भागाची कनेक्टिव्हिटी करेल, यामुळे मुंबई आणि ठाणे जोडले जाईल.

मुंबई आणि मुंबई महानगर क्षेत्रामध्ये 14 वेगवेगळे मेट्रो लाइन प्रकल्प उभारून एमएमआरडीए सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत महत्त्वपूर्ण बदल घडवून आणत आहे. सध्या शहरात घाटकोपर ते वर्सोवा दरम्यान 11 किमीची एक मेट्रो लाईन चालू आहे. याशिवाय मेट्रोचे इतर पर्याय नसल्यामुळे प्रवासी जास्त गर्दीच्या उपनगरीय लोकल गाड्यांमध्ये प्रवास करतात. यामुळे काही प्रसंगी अपघातही होतात.  तथापि, शहरात सध्या कामे सुरु असलेल्या सर्व मेट्रो मार्गिका कार्यान्वित झाल्यानंतर लोकल गाड्यांवरील ताण कमी होणार असून प्रवाशांचा वाहतुकीचा त्रासही कमी होणार आहे. वाहतुकीचे अपघातही कमी होतील. याशिवाय मेट्रोच्या वाहतुकीमुळे पर्यावरणप्रीय वाहतुकीसही चालना मिळणार असून त्यामुळे हवामानातील बदल कमी होण्यास मदत होईल.




